स्थायी समितीच्या गुरुवार दिनांक 16–08–2012 रोजी दुपारी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 7. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 8. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 9. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 10. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 11. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 12. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 13. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 14. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 2. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड.सिद्यीकी, उप निगम आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 115 :— दुर्बल घटक पदातील निधी इतर पदात वळती करण्याबाबत मागासवर्गीय कल्याण विशेष समिती यांनी केलेल्या मागणी नुसार मागासवर्गीय वस्तीकरीता सन 2012—13 चे प्रस्तावित अंदाजपत्रकात पद क्र. 416 अंतर्गत मागासवर्गीय वस्तीमध्ये टॅकर द्वारे पाणी पुरवठा करण्याकरीता रु. 700.00 लक्षाचे प्रावधान नमुद आहे. त्यापैकी रु. 600.00 लक्ष पद क्र. 670 मध्ये वळती करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 116 :— अग्निशामक व आणीबाणी सेवा विभागातील तांत्रिक दृष्टया अकार्यक्षम असलेले वेगवेगळया प्रकारचे एकुण 17 वाहने ई— निविदा व्दारे निर्लेखन मुल्यावर विक्री करुन घेण्याकरिता मा. आयुक्त यांनी मंजुरी प्रदान केली होती.

त्यानुसार तांत्रिक दृष्टया अकार्यक्षम असलेले एकूण 17 नग वेगवेगळी वाहने ई—निविदा व्दारे विक्री करण्याचा प्रस्तावास मा. स्थायी समिती यांचे मंजूरी करीता पाठविण्यात आला होता. हा प्रस्ताव सादर करते वेळेस विभागाने चुकीने इ निविदा व्दारे विक्री करुन घेण्याऐवजी जाहीर लिलाव व्दारे विक्री करुन घेणे असे प्रस्तावात नमूद केले होते व त्याच पध्दतीने स्थायी समिती ठराव क्र. 62, दि. 16.06.2012 एकमताने मंजूर करण्यात आला व या ठरावास मा. आयुक्त यांनी कार्यन्वीत सुध्दा केले आहे.

सदर प्रस्ताव मधील त्रृटी जेव्हा विभागाच्या लक्षात आली असता विभागाने पुनःश या ठरावात दुरुस्ती करुन अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागातील तांत्रीक दृष्टया अकार्यक्षम व निरुपयोगी असस्थेत आलेले वाहन क्र. 1) MTG-3625, 2) MWY-9084, 3) MWY-9085, 4) MWY-9270, 5) MWY-9269, 6) MWY-9271, 7) MWY-9111, 8) MWY-9272, 9) MWY-9112, 10) MWY-9113, 11) MZV-9069, 12) MZV-9226, 13) MHN-9456, 14) MGW-7705, 15) MZV-2196 16) MZV-8749, 17) MZV-9127, असे 10 नग फायर टेन्डर, 2

नगर शववाहिका, 1 जीप व 4 नगर मोटार सायकल असे एकूण 17 विभागीय वाहने निर्लेखन मुल्यावर ई निविदा व्दारे विक्री करुन घेण्यास मा. आयुक्तांनी मंजूरी प्रदान केली आहे.

करिता विभागाने पुनःश दुरुस्तीसह तयार करण्यात आलेल्या विभागीय वेगवेगळे 17 वाहने निर्लेखन मुल्यावर ई– निविदा व्दारे विक्री करुन घेण्यास प्रस्ताव मा. स्थायी समिती यांच्या मंजूरीस्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मूंरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 117 :– नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभाग, झोनल कार्यालय तसेच नागरी सुविधा केंद्रमध्ये दैनंदिन कामाकरिता लागणारे आवश्यक कार्यालयीन छपाई साहित्य खरेदीसाठी नविन दर करार निश्चित करण्याकरिता वार्षिक खर्च रु.10,00,000/–(दहा लक्ष) ची ई–निविदा मागविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन स्थायी समिती ठराव क्र. 86 दिनांक 27.07.2012 प्रमाणे सूचविलेल्या अटी प्रमाणे एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 118 :– नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभाग, झोनल कार्यालय मध्ये दैनंदिन कामाकरिता लागणारी आवश्यक कार्यालयीन स्टेशनरी व साहित्य खरेदीसाठी नविन दर करार करण्याकरिता वार्षिक खर्च रु.50,00,000/–(पन्नास लक्ष) ची ई–निविदा मागविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन स्थायी समिती ठराव क्र. 86 दिनांक 27.07.2012 प्रमाणे सूचविलेल्या अटी प्रमाणे एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 119 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

हस्ता /– हरीष दुबे

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

हस्ता /– दयाशंकर तिवारी

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर